अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक : अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. २४ एप्रिल २०२५ वर्ष १० वे अंक ३७ वे ब्रम्हपुरी पाने ६ किंमत २ रूपये

# हजारोंच्या संख्येत गुरूदेव भक्तांचा शांती मोर्चा
## अ.भा. संस्था मोझरी करत आहे जमीन हडपण्याचा प्रयत्न

ब्रह्मपुरी/का.प्र.

कर्मयोगी संत तुकारामदादा गीताचार्य यांच्या भु-वैकुंठ अड्याळ टेकडी येथील जमिन हडप करून कार्याचा बिमोड करू पाहणाऱ्या अखिल भारतीय सेवा मंडळ संस्था गुरुकुंज मोझरी, जि. अमरावती यांच्या विरोधात अड्याळ टेकडीचे संचालक सुबोधदादा, अध्यक्ष नवलाजी मुळे, सेवकरामजी मिलमिले, रविदादा मानव, संतोष रडके, कृष्णा सहारे, प्रविण राऊत (केंद्रीय ग्रामसभा अध्यक्ष),



कार्याध्यक्ष रेखाताई, अविनाशभाऊ आंबेकर, देवीदासजी जगनाडे, विजयराव खरवडे यांच्यासह संपूर्ण विदर्भातून ३ हजार लोकांनी उपविभागीय अधिकारी, ब्रह्मपुरी यांच्या कार्यालयावर जाहिर मोर्चा आंदोलनाची वाटचाल केली.

मुरलीधर मंदिर, टिळक नगर, ब्रह्मपुरी येथून भजन, नारे, घोषणांच्या गजरात शांती मोर्चाची सुरूवात झाली. पोलीस स्टेशन, फवारा चौक मार्गे मोर्चा येऊन शेवटी शिवाजी चौकात सुबोधदादा, रविदादा मानव व श्री सेवकरामजी मिलमिले यांनी सभेला संबोधित केले. यावेळी सुबोधदादांनी वस्तुस्थिती बयाण केली की, ५० वर्षाआधी महाराष्ट्र शासनाने ४० एकर जागा अड्याळ टेकडीच्या नावाने दिली असून तेव्हापासून आपली निरंतर ताबा वहिवाट आहे. प्रकरण न्यायालयात सुरू असतांना तहसिलदार, ब्रह्मपुरी यांनी कोणत्या अधिकाराने ७/१२ उताऱ्यावरून अड्याळ टेकडीचे नाव कमी करून अखिल भारतीय संस्था, मोझरी, अमरावती या संस्थेचे नाव चढविले. या अन्यायाच्या विरोधात अविरत आंदोलन पुकारण्यासाठी सुरूवात म्हणून हया शांती मोर्चाचे आयोजन केले आहे. प्राण जाईल तरी अड्याळ टेकडीचे सेवक लोक आपला ताबा वहिवाट सोडणार नाही. या अखिल

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# वंजारी हॉस्पिटलमधील कॅथलॅब व आयसीयू विभागावर बंदी
## जिल्हा शल्य चिकित्सकाचे रूग्णालयाला आदेश

ब्रह्मपुरी/महेश पिलारे

ब्रह्मपुरी येथील वंजारी हॉस्पिटल, ॲडव्हान्स हार्ट केअर मल्टीस्पेशालिस्ट अँड क्रिटिकल केअर या रुग्णालयाच्या अनेक तक्रारी माजी विरोधी पक्षनेते तथा ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय वडेट्टीवार व शहरातील नागरिकांनी जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय चंद्रपूर यांच्याकडे केल्या होत्या. त्या अनुषंगाने डॉ. महादेव चिंचोळे जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा रुग्णालय चंद्रपूर यांनी दिनांक १७




एप्रिल २०२५ ला जिल्हास्तरीय चौकशी समितीमार्फत सदर रुग्णालयाची प्रत्यक्ष पाहणी केली. जिल्हास्तरीय चौकशी समिती मार्फत प्राप्त झालेल्या अहवालात रुग्ण हिताच्या दृष्टीने सदर रुग्णालय हृदय शस्त्रक्रिया व त्या संबंधित चाचण्या करण्यास योग्य नसल्याने रुग्णालयातील कॅथलॅब व अतिदक्षता विभाग बंद ठेवण्याचा आदेश डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा रुग्णालय चंद्रपूर यांनी सदर रुग्णालयाला दिला आहे. यामुळे तालुक्यातील वैद्यकीय क्षेत्रात खळबळ माजली आहे.

ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय वडेट्टीवार व ब्रह्मपुरी शहरातील नागरिक शारदा करकाडे, मुखरू व्यंकटराव मेश्राम, व अजय चहांदे यांनी वंजारी हॉस्पिटल, ॲडव्हान्स हार्ट केअर मल्टीस्पेशालिस्ट अँड क्रिटिकल केअर या रुग्णालयाच्या अनेक तक्रारी केल्या होत्या. त्या अनुषंगाने जिल्हा शल्य चिकित्सक यांनी रुग्णालयाला त्रूटीची पूर्तता करण्यासंबंधी कळविले होते, मात्र वंजारी हॉस्पिटल अँड क्रिटिकल केअर रुग्णालयाने सदर त्रूटीची पूर्तता योग्य रित्या केली नाही. त्यामुळे डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा रुग्णालय चंद्रपूर यांनी दिनांक १७ एप्रिल ला जिल्हास्तरीय चौकशी समिती तर्फे वंजारी हॉस्पिटल ॲडव्हान्स हार्ट केअर मल्टीस्पेशालिस्ट अँड क्रिटिकल केअर ब्रह्मपुरी या रुग्णालयाची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. त्यात रुग्णालयातील कॅथलॅब मधील आवश्यक नियमांची पूर्तता न केल्यामुळे तसेच अतिदक्षता विभागात मुदतबाह्य औषधे असल्याचे आढळून आले. तसेच सदर रुग्णालयामध्ये निर्जंतुकीकरणाची प्रक्रिया योग्य प्रकारे करण्यात येत नसल्याचे आढळून आले, त्यामुळे रुग्णांना जंतू संसर्ग होण्याचा धोका असल्याचे जिल्हास्तरीय चौकशी समितीने आपल्या अहवालात नमूद केले.

त्यामुळे रुग्णहिताच्या दृष्टीने सदर रुग्णालयात हृदय शस्त्रक्रिया व त्या संबंधित चाचण्या करण्यास रुग्णालय योग्य नसल्याने वंजारी हॉस्पिटल ॲडव्हान्स हार्ट केअर मल्टीस्पेशालिस्ट अँड क्रिटिकल

(उर्वरित पान क्र. ६ वर)



## संपादकीय...

# लोकप्रतिनिधींशिवाय लोकशाही कशी?

साडेचार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका वारंवार पुढे ढकलल्या जात आहे. ओबीसी आरक्षणाचा मुद्दा नेहमी उपस्थित केला जात असून, न्यायालयात या विषयाच्या अनेक याचिका दाखल आहेत. ठोस कारणांशिवाय निवडणुका रोखून धरता येत नसल्याची टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने केली. परंतु, अद्याप या विषयावर तोडगा निघालेला नाही. राज्य निवडणूक आयोगाने अनेक ग्रामपंचायतींसाठी आरक्षण सोडत जाहीर केली. अनेक ग्रामपंचायतींच्या सरपंचपदासाठी आरक्षणही जाहीर केले. परंतु, निवडणुका मात्र होऊ शकल्या नाही. त्यामुळे लोकप्रतिनिधींशिवाय लोकशाही कशी, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. महाराष्ट्रात २७ हजार ९५१ ग्रामपंचायती आहेत. यातील बहुतांश ग्रामपंचायतींवर प्रशासकीय राजवट आहे. अनेक ग्रामपंचायतींसाठी आरक्षण सोडत काढून सहा महिने लोटले, परंतु, निवडणुका जाहीर होत नसल्याने नेते आणि कार्यकर्त्यांमध्ये कमालीची नाराजी आहे. सर्वोच न्यायालयाकडून मुदतीत निवडणुका घेण्याची सूचना निवडणूक आयोगाला करण्यात आली. राज्य सरकारही निवडणुका घेण्यासाठी इच्छुक आहेत. मग, घोडे अडले तरी कुठे, असा प्रश्न पडतो.

ग्रामपंचायती आणि सरपंचाना कायद्याने विशेषाधिकार दिले आहेत. ग्रामीण भागाच्या विकासासाठी हजारावर योजना आहेत. परंतु, या योजना राबविणारे सरपंच आणि ग्रामसभाच अस्तित्वात नसल्याने बहुतांश विकासकामे ठप्प आहेत. जानेवारी २०२६ मध्ये ग्रामपंचायत निवडणुकीचा पहिला टप्पा पार पडण्याची शक्यता वर्तविली जात आहे. परंतु, न्यायालयात ओबीसी आरक्षणाचा पेच सुटलेला नाही आणि अशातच नवनवीन याचिका दाखल केल्या जात आहेत. लोकसभा निवडणुकीनंतर विधानसभा निवडणूक पार पडली. यानंतर तरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होतील, अशी अपेक्षा होती. या निवडणुकांच्या मार्गातील ओबीसी आरक्षण केवळ एवढाच अडसर नाही तर अन्य अनेक मुद्यांबाबत सर्वोच न्यायालयात याचिका दाखल आहेत. या सर्व प्रश्नांवर न्यायालयाने एकत्रित सुनावणी घ्यावी, अशी जनतेची अपेक्षा आहे. केवळ ग्रामपंचायतीच्याच नाही, तर मुंबईसह राज्यातील २९ महानगरपालिका, २६ जिल्हा परिषदा, २५७ नगरपालिका आणि २८९ नगर पंचायतींच्या निवडणुका बाकी आहेत. सर्वोच न्यायालयाने यासंदर्भातील ढीगभर याचिकांचा निपटारा केला तरीही निवडणूक कार्यक्रम काही घोषित होऊ शकला नाही!

जवळपास सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासक असल्याने अधिकाऱ्यांवर कोणाचाच वचक राहिलेला नाही. नको तिथे पैसा खर्ची होत आहे. आणि गरजेच्या ठिकाणी हात आखडता घेतला जात आहे. हा सर्व सावळागोंधळ रोखण्यासाठी निवडणुका हाच एकमेव मार्ग आहे आणि नेमका हाच मार्ग विविध कारणांनी अवरुद्ध करून ठेवलेला आहे. निवडणुकांसंदर्भातील सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी वारंवार पुढे ढकलली जात आहे. आता जनता या प्रकाराला त्रासली असून होईल त्या स्थितीत निवडणुका घ्या, अशी मागणी होऊ लागली आहे. २५ फेब्रुवारी २०२५ च्या सुनावणीतही फार काही निष्पन्न झालेले नाही, स्थानिक पातळीवर लोकप्रतिनिधी नसल्याने नागरिकांची विविध कामांसाठी परवड होत आहे. संपूर्ण महाराष्ट्राचाच कारभार सध्या अधिकाऱ्यांच्या वर्चस्वाखाली आहे. निवडणुका होत नसल्याने काहींनी यासाठीही न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत. परिणामी, न्यायालयाचाही वेळ खर्ची पडत आहे. लोकप्रतिनिधींअभावी रस्त्यावरील खड्डे, गटारी-नाल्यांची सफाई, पाण्याच्या पाईपलाईनची दुरुस्ती एवढेच काय, नागरिकांच्या प्रमाणपत्रांचीही कामे खोळंबली आहेत. लोकप्रतिनिधींवर नागरिकांचा वचक असतो. कारण, त्यांना पुन्हा निवडून यायचे असते. परंतु, अधिकाऱ्यांना ही भीती नसते. काही ठिकाणी प्रत्यक्ष आमदारांनाच ही स्थानिक कामे करावी लागत आहे. मार्च २०२१ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षण ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडता येणार नाही, या सबबीवर सर्वोच्च न्यायालयाने रद्द केले आणि तेव्हापासून महाराष्ट्राच्या वाट्याला ही डोकेदुखी आली. तत्कालीन सरकारने आपली बाजू योग्यरीत्या मांडली असती तर आज हा पेच निर्माण झाला नसता. परंतु, आता पश्चात्ताप करण्याशिवाय उपाय नाही होऊ लागली आहे. सरकार निवडणुका घेण्याबाबत आग्रहीसुद्धा आहे. परंतु, न्यायालयीन कामकाजात सरकारला हस्तक्षेप करण्याचा अधिकार नसतो. परिणामी, हा मुद्दा खूपच गुंतागुंतीचा होऊन बसला आहे.

# एनसीसी छात्रांचा निरोप समारंभ व सत्कार सोहळा




ब्रम्हपुरी/का.प्र.

नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रह्मपुरीच्या एनसीसी युनिटतर्फे सत्र २०२४-२५ करिता भव्य व भावपूर्ण निरोप समारंभ आणि सत्कार सोहळ्याचे आयोजन स्व. मदनगोपालजी भैया सभागृहात करण्यात आले. या कार्यक्रमात वरिष्ठ एनसीसी कॅडेट्सच्या कामगिरीचे आणि उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात लेफ्टनंट अभिजीत एस. परकरवार यांच्या प्रस्तावनेने झाली. त्यांनी मान्यवरांचे स्वागत केले. एनसीसी कॅडेट्समध्ये शिस्त, सेवा आणि नेतृत्वगुण रुजविण्यात येणाऱ्या मूल्यांचे त्यांनी विशेष उल्लेख केले तसेच कॉलेज व एनसीसी बटालियनच्या सातत्यपूर्ण सहकार्याबद्दल त्यांनी आभार मानले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. डी. एच. गहाणे, प्राचार्य, एन.एच. कॉलेज यांनी भूषवले. प्रमुख पाहुणे म्हणून नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया, कर्नल व्ही. सी. शर्मा, कमांडिंग ऑफिसर, २० महाराष्ट्र बटालियन एनसीसी, नागपूर हे उपस्थित होते.

कार्यक्रमात उपप्राचार्य डॉ. एस.एम. शेकोकार, डॉ. वरभे, प्राचार्य, शांताबाई भैया महाविद्यालय, ब्रह्मपुरी, कॅप्टन डॉ. कुलजीत कौर गिल, कॅप्टन प्रा. अभिजीत परकरवार, केयर टेकर प्रा. रेवनदास बोरकर यांचीही प्रेरणादायी व गौरवशाली उपस्थिती होती. या कार्यक्रमात एन.सी.सी. मधिल उल्लेखनीय कामगीरीबद्दल डिम्पल पाथोडे, रोहिणी हजारे आणि पायल सहारे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच थर्ड ईयर सीनियर कैडेट्सला सुद्धा स्मृति चिह्न देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कॅडेट प्रियशील चंदनखेडे आणि कॅडेट आरती भानारकर यांनी केले. तसेच कॅडेट सुहानी देशमुख हिने सर्व मान्यवर, सहभागी आणि योगदान देणाऱ्यांचे आभार मानले.

# ‘भिकारी’ चित्रपटाला सर्वोत्कृष्ट शॉर्ट फिल्म पुरस्कार

## ब्रम्हपुरीच्या शिरपेचात सन्मानाचा तुरा

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यातील उदापूर येथील रहिवासी असलेले संत कबीर फिल्म प्रोडक्शन्स, चित्रपटाला सर्वोत्कृष्ट शॉर्ट फिल्म पुरस्कार प्राप्त झाला. जेष्ठ निर्माते आणि साहित्यिक डॉ.रमेश विवेकी आणि अंतिमा कोल्हापूरकर यांच्या



हस्ते पुरस्कार बहाल करण्यात आला.

नागपूर चे चित्रपट दिग्दर्शक व लेखक तसेच विदर्भ कोंकण ग्रामीण बँकेचे कर्मचारी आशिष अशोक नागदेवते दिग्दर्शित ‘भिकारी’ या लघू चित्रपटाला नुकतेच कोल्हापूर येथे झालेल्या नॅशनल फिल्म फेस्टिवल मध्ये सर्वोत्कृष्ट शॉर्ट फिल्म पुरस्कार प्राप्त झाला.

या चित्रपटातील अभिनेते तथा सुप्रसिद्ध साहित्यिक रोशनकुमार पिलेवान यांनी हा पुरस्कार स्विकारला. सदर फिल्म फेस्टिवल मध्ये एकूण २२० चित्रपटांनी सहभाग नोंदविला होता. चित्रपटाचा आशय, विषय आणि दर्जा बघता भिकारी या लघु

भिकारी हा चित्रपट समाजातील वास्तवीक प्रश्नांवर आधारित असून तो समाजाला प्रेरणादायी ठरणारा आहे. चित्रपटाचे गीत मुळचे ब्रम्हपुरी तालुक्यातील पिंपळगाव (भो) येथील सुप्रसिद्ध लेखक व कवी रोशनकुमार पिलेवान यांनी लिहिलेले असून त्याद्वारे समाजाची वास्तविकता दर्शविली आहे. नुकतेच या चित्रपटाला बेस्ट दिग्दर्शक आशिष नागदेवते व अभिनेते सुरेंद्र मेश्राम यांना दादासाहेब फाळके आंतरराष्ट्रीय मोटिवेशनल पुरस्कार सुद्धा प्राप्त झाला होता. त्यांच्या या यशाबद्दल विदर्भ कोंकण ग्रामीण बँकेचे कर्मचारी, चित्रपट दिग्दर्शक नागेश वाहुरवाघ, अभिनेते सुरेंद्र मेश्राम, लेखक रोशनकुमार पिलेवान तसेच संत कबीर फिल्म प्रोडक्शनचे सदस्य, नातेवाईक व मित्रमंडळींनी शुभेच्छा दिल्या.

## विनोदिनी

एक दिन अनूप जलोटा जोधपुर आये हुये थे,
उन्होंने आकाशवाणी में इंटरव्यू देने के लिए ऑल इंडिया रेडियो के स्टूडियो जाने के लिए टैक्सी ली... वहां पहुंचने के बाद, अनूप जलोटा ने ड्राइवर से कहा.. ४० मिनट तक रुक जाओ, मै अभी आता हूं...
लेकिन ड्राइवर ने असमर्थता प्रकट करते हुए कहा, कि सर मै रुकने में असमर्थ हूं,
क्यूंकि मुझे घर जा के रेडियो पर अनूप जलोटा का इंटरव्यू सुनना है !
अनूप जलोटा मुस्कुराए और उन्होंने अपनी पहचान बिना बताए, टैक्सी ड्राइवर को १०० की जगह ५०० का नोट गर्व से थमा दिया...
ड्राइवर ने विनम्रता से ५०० का नोट हाथ में लिया और बोला - सर.... मै आपका यहीं इंतज़ार करुंगा, ऐसी की तैसी साले अनूप जलोटा की!’

# ॲग्रिस्टॅक योजनेच्या नोंदणीत ब्रम्हपुरी तालुका आघाडीवर

## तालुक्यात ३०,८७१ शेतकऱ्यांची नोंदणी, जिल्ह्यात २ लाख ५८ हजार ८५८ शेतकऱ्यांची नोंदणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

कृषी क्षेत्राला डिजिटल युगात पुढे नेण्यासाठी केंद्र शासनातर्फे ॲग्रिस्टॅक योजना सुरू करण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून ॲग्रिस्टॅक योजनेसाठी शेतकऱ्यांची नोंदणी करण्याचे काम कृषी आणि महसूल विभागाच्या माध्यमातून सुरू आहे. १७ एप्रिलपर्यंत जिल्ह्यातील २ लाख ५८ हजार ८५८ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे.

सर्वाधिक नोंदणी ब्रह्मपुरी तालुक्यात झाली आहे. या तालुक्यात ३० हजार ८७१ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. त्यापाठोपाठ चिमूर तालुक्यात २७ हजार २३७ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. बल्लारपूर तालुक्यात केवळ ४ हजार २६४ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने शेतकऱ्यांसाठी विविध सेवा आणि सुविधा उपलब्ध करून देण्याच्या हेतूने ॲग्रिस्टॅक योजना राबविली जात आहे. महसूल, कृषी विभाग आणि स्थानिक प्रशासनाच्या समन्वयाने या योजनेची अंमलबजावणी सुरू आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जमीन नोंदी, पीक उत्पादन, बाजारपेठेतील संधी, शासकीय योजना, आधुनिक तंत्रज्ञानाशी संबंधित माहिती डिजिटल पद्धतीने एकत्रित केली जाणार आहे. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीशी संबंधित निर्णय अधिक माहितीपूर्ण आणि सोप्या पद्धतीने घेता येणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आले आहे. ॲग्निस्टॅकच्या माध्यमातून शेतकऱ्यांना ओळख क्रमांक मिळणार आहे.

| तालुके | : | नोंदणी |
|---|---|---|
| चिमूर | : | 27,237 |
| ब्रह्मपुरी | : | 30,871 |
| कोरपना | : | 11,437 |
| सावली | : | 20,182 |
| राजुरा | : | 11,987 |
| नागभीड | : | 21,868 |
| मूल | : | 17,070 |
| पोंभुर्णा | : | 9726 |
| गोंडपिंपरी | : | 13,373 |
| वरोरा | : | 22,435 |
| बल्लारपूर | : | 4264 |
| भद्रावती | : | 14,069 |
| सिंदेवाही | : | 15,526 |
| चंद्रपूर | : | 8813 |
| एकूण | : | 2,28,858 |

गेल्या काही महिन्यांपासून नोंदणीचे काम जिल्हाभरात सुरू आहे. जिल्ह्यात कृषी विभागाच्या माध्यमातून कृषी गणना केली जाते. २०११ मध्ये करण्यात आलेल्या गणनेनुसार जिल्ह्यात साडेतीन लाख शेतकऱ्यांची संख्या आहे. दहा वर्षांपासून कृषी गणना झाली नाही. त्यामुळे हा आकडा आता निश्चितच वाढणार आहे. मात्र, जुन्या आकड्याच्या आधारे ॲग्रिस्टीक नोंदणीचे काम सुरू आहे. आतापर्यंत २ लाख ५८ हजार ८५८ शेतकऱ्यांची नोंदणी झाली आहे.

# नॅक मान्यता प्रक्रीयेतील सुधार जाणणे आवश्यक

## एफडीपी कार्यक्रम : डॉ. किशोर नाकतोडे यांचे प्रतिपादन



ब्रह्मपुरी/का.प्र.

'नॅक हे महाविद्यालयीन गुणवत्ता मूल्यांकनासाठी निर्माण झाले. यामध्ये दिवसागणिक अनेक बदल होत आहेत. महाविद्यालयातील संशोधन, सोयीसुविधा, विद्यार्थ्यांचा सहभाग, माजी विद्यार्थ्यांचे योगदान, सुसज्ज ग्रंथालय, निर्मित लॅब आणि समाजाला व विद्यार्थ्यांना त्याचा झालेला फायदा अशा अनेक बाबींवर नॅक भर देऊन त्या महाविद्यालयाची गुणवत्ता सिद्ध करते. या नॅक मान्यता प्रकीयेतील सुधार जाणणे गरजेचे, असल्याचे प्रतिपादन ने.हि. महाविद्यालयातील नॅक समन्वयक डॉ. किशोर नाकतोडेंनी केले.

ते सहा दिवसीय एफडीपी कार्यक्रमात 'नॅक मान्यता प्रकियेतील सुधार' या विषयावर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. डी.एच. गहाणे तर प्रमुख उपस्थितीत डॉ. रेखा मेश्राम, डॉ.राजेंद्र डांगे व एफडीपी समन्वयक डॉ.धनराज खानोरकर उपस्थित होते. याप्रसंगी आपल्या अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. गहाणेंनी यामागची भूमिका विशद करुन या सहा दिवसीय कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या.

प्रास्ताविक डॉ.अरविंद मुंगोले तर आभार डॉ.धनराज खानोरकरांनी केले. यशस्वीतेसाठी डॉ.असलम शेख, डॉ.युवराज मेश्राम, डॉ. भास्कर लेनगुरेंनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाला समस्त प्राध्यापकवृंद उपस्थित होता.

**पाणी जपून वापरा**

# बंगालमधील हिंदूवरील हिंसाचाराविरोधात राष्ट्रपती राजवटीची मागणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

लोकशाही पद्धतीने राज्यसभेत व लोकसभेत वक्फ विधेयक मंजुरीनंतर पश्चिम बंगाल मध्ये सुरू झालेला हिंदू वरील हिंसाचार अधिकच तीव्र होत आहे. हा केवळ विरोध नसुन एक प्रकारची क्रूर चिथावणी आहे. याच क्रुर मानसिकतेला आपले अनेक हिंदु बांधव बळी पडत आहेत. त्यांचे संरक्षण व्हावे, हिंदु विरोधी जेहाद्यांना आळा बसावा आणि अकार्यक्षम बंगाल सरकार बरखास्त होऊन तिथे राष्ट्रपती राजवट लागु व्हावी या प्रमुख मागणीचे निवेदन महामहिम राष्ट्रपती यांना देण्याकरिता दिनांक १९/०४/२०२५ ला विश्व हिंदु परिषदेच्या माध्यमातून तहसीलदार ब्रम्हपुरी यांच्याद्वारे देण्यात आले..

यावेळी शेष मंदिरामधून पायदळ निघून इंदिरा गांधी चौक ते तहसील कार्यालय या ठिकाणी घोषणा करीत तहसीलदार यांना निवेदन दिले. या वेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे विभाग



संघचालक जयंतराव खरवडे, विहिप जिल्हा उपाध्यक्ष राजुजी आबदेव, विश्व हिंदु परिषद जिल्हा मंत्री रोशन नवघडे, विहिप नगर अध्यक्ष अमितजी मेंडूले, भाजपा शहर अध्यक्ष अरविंद नंदुरकर यांचे हस्ते व सकल हिंदू समाजाचे वतीने तहसीलदार ब्रम्हपुरी यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी रा.स्व.संघ, विहिपं, बजरंग दल, मातृशक्ती, दुर्गा वाहिनी, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, भाजपा, धर्मध्वज, आसाराम बापू परिवार, गायत्री परिवार, शिवजयंती उत्सव समिती, विविध सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक संस्थांचे हिंदू बांधव, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# ब्रम्हपुरी बस आगाराला मिळाल्या ६ नवीन बसेस

## प्रवाशी व आगार कर्मचाऱ्यांमध्ये आनंद

ब्रम्हपुरी/का.प्र.

चंद्रपूर जिल्ह्यातील आणि गडचिरोली विभागांतर्गत ब्रम्हपुरी आगार व्यवसायाच्या दृष्टीने अव्वल क्रमांकावर असून महत्वाचे ठिकाण आहे. ब्रम्हपुरी आगारातून लांब टप्प्याच्या गाड्या सोडण्यात येतात. मात्र या आगाराला गाड्यांची कमतरता असल्यामुळे प्रवाशांची तसेच ब्रम्हपुरी आगारातील कर्मचाऱ्यांना गैरसोय व इतर समस्यांना सामोरे



जावे लागत होते. वेळेवर गाड्या उपलब्ध होत नसल्यामुळे प्रवाशांचे प्रचंड हाल होत होते. ही अडचण लक्षात घेता ब्रम्हपुरी येथील सामाजिक कार्यकर्ता तथा पत्रकार प्रशांत डांगे यांनी मागील दोन वर्षापासून संबंधित विभाग, मंत्री यांचेकडे ब्रम्हपुरी आगाराला नवीन बसेस मिळावे यासाठी पत्रव्यवहार केले होते.

नुकतेच नाम. प्रतापजी सरनाईक परिवहन मंत्री तसेच व्यवस्थापकीय संचालक परिवहन विभाग मुंबई यांना ब्रम्हपुरी आगाराला नवीन बसेस मिळण्याची पत्राद्वारे मागणी केली होती. सोबतच खासदार नामदेव किरसान, विद्यमान आमदार तथा माजी विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी शिफारस पत्र देऊन मागणी करावी तसेच माजी आमदार अतुलभाऊ देशकर यांना सुद्धा आपण पत्रव्यवहार करावा अशी विनंती केली होती.

त्यानुसार दि. १६ एप्रिलला पहिल्या टप्प्यात ब्रम्हपुरी आगाराला नवीन पाच बसेस मिळालेल्या आहेत तर उर्वरित पाच बसेस दुसऱ्या टप्प्यात मिळणार आहेत.

# विद्यानगरात नळाच्या पाण्यासाठी हाहाकार

## पाणीपुरवठा पुर्ववत करण्याची नागरिकांची मागणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी नगर पालिकेच्या वतीने शहरात नळाद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. परंतु गेल्या काही दिवसांपासून ब्रम्हपुरी नगरपालिकेच्या वतीने नळ कनेक्शनद्वारे करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठ्याचा कालावधी अत्यंत कमी करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यानगर वार्डातील अनेक कुटूंबाना घरघूती वापरासाठी व पिण्यासाठी पाण्याची अडचण निर्माण झाली आहे.

ब्रम्हपुरी शहर हे शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक, वैद्यकिय व औद्योगिक नगरी म्हणून प्रचलित आहे. त्यामुळे ब्रम्हपुरी शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. ब्रम्हपुरी शहराला पिण्यासाठी व घरगुती वापरासाठी नळ कनेक्शनद्वारे पाणी पुरवठा करण्याचे काम ब्रम्हपुरी नगर पालिकेच्या वतीने करण्यात येते. मात्र, विदर्भात सर्वात उष्ण शहर म्हणून ब्रम्हपुरीची ओळख असतांना, याच शहरात पाण्याची अडचण निर्माण झाली आहे. भर उन्हाळ्यात नगर पालिके मार्फत नळ कनेक्शनद्वारे करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठ्याचा कालावधी कमी केल्यामुळे विद्यानगर वार्डातील अनेक कुटूंबाना घरगुती वापरासाठी व पिण्याच्या पाण्याची अडचण निर्माण झाली आहे. शिवाय अनेक कुटूंब हे भाड्याच्या घरात किरायाने राहत असल्यामुळे कुणाला केवळ पिण्यासाठी पाणी उपलब्ध होते. तर कुणाच्या नशीबी एक हंडा पाणी देखील मिळत नसल्याच्या तक्रारी ऐकावयास मिळत आहेत. ऐन उन्हाळ्याच्या दिवसांत ब्रम्हपुरी नगर पालिकेने पाणी पुरवठा करण्याचा कालावधी कमी केल्यामुळे अनेकांना बाहेरील कॅनचे पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागत आहे. त्यामुळे कॅनचे पाणी हे पिण्याच्या गुणवत्तेचे आहे की कसे याबाबत नागरिक अनभिज्ञ आहेत. सदर बाहेरील कॅनचे पाणी पिण्यासाठी वापरल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्यास, त्यास ब्रम्हपुरी नगर पालिका सर्वस्वी जबाबदार रहाणार? की कोण असे एक नव्हे अनेक प्रश्न सुज्ञ नागरिक विचारत आहेत. शिवाय उन्हाळ्यात शहराचे तापमान अधिक असल्यामुळे उष्णतेपासून बचाव करण्यासाठी कुलरचा आधार घ्यावा लागतो, परंतु पाण्याची अडचण निर्माण झाल्यामुळे पाण्यासाठी नागरिकांना वणवन भटकावे लागत आहे. ब्रम्हपुरी नगर पालिकेने पाणी पुरवठा करण्याचा कालावधी पूर्ववत करावा, अशी मागणी विद्यानगर येथील सुज्ञ नागरिकांनी केली आहे.

❋❋❋❋❋❋

# गणेश ॲग्रिकल्चरल एजन्सीच्या पाणपोईचे लोकार्पण



ब्रम्हपुरी/का.प्र.

हनुमान जयंतीच्या शुभपर्वावर दिनांक १२ एप्रिलला ब्रम्हपुरी येथील भगतसिंग चौकातील पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले.

गणेश ॲग्रिकल्चरल एजन्सीचे मालक व समाजसेवक तथा समाजगौरव पुरस्कारप्राप्त प्रतिष्ठित व्यापारी पंढरीनाथ खानोरकर यांनी रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची व वाटसरूंची तहान भागविण्यासाठी येथील भगतसिंग चौकात असलेल्या आपल्या प्रतिष्ठानाचे लगत मागील २२ वर्षापासून पाणपोई सुरु करून सामाजिक बांधीलकी जोपासली आहे. सध्या उन्हाळ्याचे दिवस आहेत, सुर्याचा पारा चांगला वर चढत आहे. त्यामुळे रेल्वे प्रवासी व सामान्य नागरीकांना थंड पाण्याची गरज पडते. त्यांना योग्य वेळी व योग्य ठिकाणी थंड पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, या उदात्त हेतुने व दर वर्षीच्या उन्हाळ्याचा अनुभव लक्षात घेता माठातील व रांजनातील पाणी उष्णतेमुळे थंड होत नसल्याने मागील ५ वर्षापासून थंड पाण्याकरीता वाटर कुलरची व्यवस्था करण्यात आली आहे.

पाणपोईचे लोकार्पण दिपकजी उराडे यांचे उपस्थितीत चंदनराव समर्थ यांचे शुभहस्ते करण्यात आले. या प्रसंगी पंढरीनाथ खानोरकर, कुंदाताई खानोरकर, अनिरुद्ध राऊत, भास्कर सहारे, गोलू साखरकर, कवि कामथे, प्रविण मेश्राम, महेश दिघोरे, पराग मैंद, प्रविण शेंडे तसेच बालगोपाल मंडळी उपस्थित होते.

# आयटकचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विशाल धरणे व निदर्शने

ब्रम्हपुरी/का.प्र.

आयटकच्या वतीने चार श्रम संहिता रद्द करा, महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक मागे घ्या, योजना कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा द्या, किमान वेतन लागू करा, पेन्शन देण्याचा कायदा मंजूर करा या व इतर मागणी साठी आयटक चे राज्य सचिव कॉ विनोद झोडगे पाटील, जिल्हा अध्यक्ष दिलीप बर्गि व भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य कौन्सिल सदस्य रवींद्र उमाटे यांच्या नेतृत्वात चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालय समोर दिनांक २२ एप्रिल २०२५ रोजी विशाल धरणे व निदर्शने आंदोलन करण्यात आले.

केंद्र व विविध राज्य सरकारे कामगाराचे दमन करणारे ४ नवीन कायदे तयार करून लागू करण्याचा जो प्रयत्न चालू केले आहे. त्या विरोधात आयटक राज्य सचिव कॉ. विनोद झोडगे, कॉ.दिलीप बर्गि, भाकप नेते प्रा नामदेव कनाके, कॉ.प्रकाश रेड्डी, संयुक्त खदान मजदुर संघ नेते कॉ.एन.टी.म्हस्के, दिलीप कनकुलवार, वीज कामगार फेडरेशन नेते प्रकाश वानखेडे, राज्य कर्मचारी संघटना नेते शालिक माऊलीकर, राजू गईनवार, प्रदीप चिताडे, कृषी मित्र संघटना अध्यक्ष किशोर निब्रड, निकिता नीर, किरण धोंगडे, श्रीधर वाढई, कुंदा कोहपरे, अरुण भेलके इत्यादी कामगार नेत्यांनी धरणे आंदोलनाला संबोधित केले.

# इंसान में पहली बार लगाया सुअर का लिवर

## जिगर के रोगियों को मिल सकता है नया जीवन



ब्रम्हपुरी/का.प्र.

चीन के डॉक्टरों ने मेडिकल क्षेत्र में चमत्कार कर दिखाया है. डॉक्टरों ने पहली बार आनुवंशिक रूप से संशोधित सुअर के लिवर (यकृत) को इंसान में प्रत्यारोपित किया. यह प्रत्यारोपण एक ब्रेन-डेड इंसान में किया गया है, जिसने भविष्य में रोगियों के लिए जीवन-रक्षक दाता विकल्प की उम्मीदें बढ़ा दी हैं. पिछले कुछ वर्षों में सुअर इंसानों के लिए सबसे अच्छे अंग दाता के रूप में सामने आए हैं. अमेरिकी डॉक्टरों ने बीते कुछ समय में डॉक्टरों ने रोगियों ने सुअर के गुर्दे और दिल प्रत्यारोपित किए हैं. सुअर के लिवर का परीक्षण इससे पहले कभी भी मानव शरीर के अंदर नहीं किया गया था. इस प्रत्यारोपण के बाद शोधकर्ताओं को उम्मीद है कि जीन संशोधित सुअर गंभीर रूप से बीमार रोगियों को कम से कम अस्थायी राहत दे सकते हैं.

अध्ययन के अनुसार, १० मार्च २०२४ को एक छोटे सुअर के लिवर को ब्रेन डेड वयस्क में प्रत्यारोपित किया गया है. इस लिवर में बेहतर दाना बनाने के लिए छह जीन को संशोधित किया गया था. डॉक्टरों ने बताया कि परिवार के अनुरोध पर १० दिनों के बाद परीक्षण समाप्त कर दिया गया. इस दौरान सख्त नैतिक दिशा-निर्देशों का पालन किया गया था. डॉक्टरों ने रोगी के नाम, लिंग और अन्य विवरण का खुलासा नहीं किया था. अध्ययन के अनुसार, इस दौरान रोगी का मूल लिवर मौजूद था और इस तरह के प्रत्यारोपण को सहायक ट्रांसप्लांट कहा जाता है. डॉक्टरों ने उम्मीद जताई है कि इस तरह का प्रत्यारोपण मानव दाता की प्रतीक्षा कर रहे बीमार लोगों के मौजूदा लिवर को सहारा देने के लिए पुल अंग के रूप में काम कर सकता है. १० दिनों में डॉक्टरों ने लिवर के रक्त प्रवाह, पित्त बनाने, प्रतिरक्षा प्रतिक्रिया और अन्य प्रमुख कार्यों की निगरानी की. सुअर का लिवर 'बहुत अच्छी तरह से काम कर रहा था' और 'सुचारू रूप से पित्त का उत्पादन कर रहा था.' साथ ही यह प्रमुख प्रोटीन एल्ब्यूमिन का उत्पादन भी कर रहा था.

## सड़क हादसे रोकने के लिए राहगीर योजना

# घायल को अस्पताल पहुंचाने वाले को मिलेगा २५ हजार का इनाम

ब्रम्हपुरी/का.प्र.

केन्द्रीय सड़क परिवहन मंत्री नितिन गडकरी ने कहा कि सड़क दुर्घटनाओं में होने वाली मौतों में कमी लाने के लिए राहगीर योजना शुरू की जा रही है। इस स्कीम के तहत अगर कोई एक्सीडेंट होता है और घायल को लेकर कोई अस्पताल जाता है और उसकी जान बचाता है तो उसे २५ हजार रुपए का अवार्ड दिया जाएगा। साथ ही जिस अस्पताल में वह भर्ती होगा उसका अधिकतम ७ दिन का खर्चा या डेढ़ लाख रुपए सरकार देगी। गडकरी का कहना है कि इस योजना से ५० हजार लोगों की जान बचाई जा सकती है।

●●●●●●●

# चिचखेडा परिसरातील नरभक्षी वाघ जेरबंद



ब्रम्हपुरी/का.प्र.

दिनांक १३ एप्रिलला विनायक विठोबा जांभुळे रा. चिचखेडा वय वर्षे ६० हे मोहाफुले गोळा करीत असतांना त्यांचेवर वाघाने हल्ला करुन ठार केलेले होते व त्या आधी पण एका व्यक्तीला ठार केले व दोन व्यक्तींना जखमी केले होते त्यामुळे मानव व वन्यजीव संघर्ष उदभवू नये याकरीता T-३ वाघाला जेरबंद करणे आवश्यक होते.

त्याअनुषंगाने दि. १७ एप्रिलला उत्तर ब्रम्हपुरी वनपरिक्षेत्रातील उपक्षेत्र मेंडकी नियतक्षेत्र चिचखेडा मधील कक्ष क्रमांक १५२ मध्ये पशुवैद्यकिय अधिकारी डॉ. रविकांत खोब्रागडे यांनी डॉट तयार करुन दिला त्यानंतर अजय सी. मराठे पोलीस हवालदार निशानेबाज यांनी T-३ वाघाला अचूक निशाणा लावून दुपारी १२.१५ वाजता डॉट मारुन जेरबंद करण्यात आले.

# ब्रम्हपुरी वनविभागाच्या नर्सरीला आग

## नागरिकांच्या तत्परतेने अनर्थ टळला

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील खेड हद्दीतील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या मागील वनविभागाच्या नर्सरीत मंगळवार, २२ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजताच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली.

ही आग काही क्षणातच झपाट्याने पसरली. त्यामुळे नर्सरी परिसरात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मात्र, नागरिक व वनविभागाच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला. नर्सरीला लागूनच वस्ती असल्याने आग लागल्याचे लक्षात येताच गावकऱ्यांनी तत्काळ धाव घेतली. खेड येथील लंकेश दाणी, सुखदेव मेश्राम आणि रामकृष्ण मेश्राम यांनी आपल्या घरातील बोरवेलला पाईप लावून पाण्याचा मारा करत आगीवर नियंत्रण मिळविण्यास सहकार्य केले. ग्रामपंचायत सदस्य दीपक देशमुख व किशोर लाडे अध्यक्ष ग्रामसुरक्षा दल यांनीदेखील वनविभागाच्या कर्मचाऱ्यांसह नागरिकांना समन्वय साधून आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. या सर्वांच्या प्रयत्नांमुळे अग्निशमन वाहन येईपर्यंत आग आटोक्यात आणण्यात यश आले.

दरम्यान, ब्रह्मपुरीजवळच असलेल्या कहाली गावात तणसीच्या दोन ढिगाऱ्यांना आग लागल्याची घटना मंगळवारी उघडकीस आली. येथेसुद्धा अग्नीशमन दलाने आगीवर लगेचच नियंत्रण मिळविले.

# ब्रम्हपुरी तालुक्यात बळीराजा शेतपांदन रस्ता रखडला

## मस्टर मंजूरीसाठी प्रमोद चिमूरकर यांचे तहसिलदारांना निवेदन

ब्रम्हपुरी/प्रतिनिधी

ब्रम्हपुरी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला शेत पांदन रस्ता अजूनही अर्धवट अवस्थेत पडून आहे. सदर रस्त्याचे काम थांबण्यामागील प्रमुख कारण म्हणजे मस्टर मंजुरी न मिळणे होय. पांदन रस्ते तयार झाले नसल्याने शेतकऱ्यांना आपल्या शेतापर्यंत जाण्यास अडथळा निर्माण होणार असून, येणाऱ्या पावसाळ्यात मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. यासंदर्भात माजी जि.प. सदस्य प्रमोद चिमुरकर यांनी तहसीलदार ब्रम्हपुरी यांच्याकडे लेखी निवेदन सादर करून मस्टर मंजुरी तातडीने देण्याची मागणी केली आहे.

चंद्रपूर जिल्हा परिषद बांधकाम विभागामार्फत बळीराजा शेत पांदन रस्त्याचे काम ई-निविदा प्रक्रियेद्वारे मंजूर करण्यात आले होते. काम सुरू करण्याचे आदेश ऑगस्ट व नोव्हेंबर महिन्यांत देण्यात आले. मात्र, पावसाळा आणि शेतात पिके असल्यामुळे बळीराजा शेत पांदन रस्त्याचे काम सुरू होऊ शकले नाही. नंतर नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यांत मस्टरच्या आधारे काही प्रमाणात काम झाले. परंतु अचानक मस्टर मंजुरी बंद झाल्यामुळे रस्त्याचे काम पुन्हा थांबले.

या प्रलंबित रस्त्याच्या कामासाठी जिल्हाधिकारी कार्यालय व मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. चंद्रपूर यांनी मा. आयुक्त (मनरेगा), नागपूर यांच्याकडे पत्र पाठवले असून, त्यामध्ये काम सुरू ठेवण्यात येत असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. मात्र ब्रम्हपुरी तालुक्यात बळीराजा शेत पांदन रस्त्याचे काम बंद आहे. सध्या उन्हाळ्याचा १ महिना राहिला असून पावसाळा तोंडावर आहे. अशा वेळी रस्ता पूर्ण न झाल्यास शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीसाठी जाण्यात अडचणी येणार आहेत. तसेच रोहयो योजनेला गती देण्याकरीता काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे, अशी मागणी प्रमोद चिमुरकर यांनी निवेदनात केली आहे.

******

# मंथन सामान्य ज्ञान स्पर्धेत ओमखेत प्रथम

ब्रम्हपुरी/का.प्र.

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, जुगनाळा येथील इयत्ता पाचवी मध्ये शिकणारा विद्यार्थी ओमखेत शालिकराम मैंद याने राज्यस्तरीय मंथन सामान्य ज्ञान स्पर्धेत केंद्रातून प्रथम क्रमांक, विभागातून चौदावा क्रमांक तर राज्यातून २५ वा क्रमांक पटकाविला.



त्याच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक गजानन प्रधान, वर्ग शिक्षिका प्रभा गणवीर, संगीता वैद्य, गोवर्धन टिकले, योगराज बोरकुटे, धनपाल दमके, गोपाल राऊत, स्वाती लाडेकर तथा स्वाती नाकाडे आदी शिक्षक वृंदांनी त्याचे अभिनंदन केले. त्याने आपल्या यशाचे श्रेय आपले आई वडील तसेच गुरुजनांना दिले.

# तन-मन लावून संशोधन करणे गरजेचे - डॉ. खानोरकर



ब्रह्मपुरी/का.प्र.

'संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. संशोधन अनेक पातळ्यांवर केले जाते. संशोधक विद्यार्थ्यांनी संबंधित विषयाची फोड करुन नवे नवनित, नवा विचार मांडायचा असतो. त्यामुळे संशोधन हे तन-मन लावून करावे लागते', असे मार्मिक विवेचन ने.हि. महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख डॉ. धनराज खानोरकरांनी केले.

ते स्थानिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमामध्ये 'संशोधनाच्या दिशा' या विषयावर बोलत होते. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून मराठी विभागप्रमुख डॉ. जगदीश मेश्राम यांनी विद्यार्थ्यांच्या संशोधनाविषयी विविध विषयाला स्पर्श केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवेश कांबळे यांच्या मार्गदर्शनाने हा कार्यक्रम महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने घेण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन प्रा.के.एस.मेश्राम यांनी केले.

## - निधन वार्ता -



ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील कुर्झा हुडकी वॉर्डातील रहिवाशी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयातील सेवानिवृत्त शिक्षक विनायक बनाजी रामटेके वय ८२ वर्षे यांचे वृद्धापकाळाने दिनांक २१ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांचा अंतिम संस्कार २२ एप्रिल रोजी पार पडला.

आता लवकरच आमचा ई-पेपर येणार...
थोड्याच अवधीनंतर
ब्रम्हपुरी समाचारचा E-Paper
प्रकाशित करण्यात येईल. याची वाचकांनी नोंद घ्यावी.

### ... QUOTES ...

"The purpose of life is not to be happy. It is to be useful, to be honorable, to be compassionate, to have it make so difference that you have lived and lived well."
- Ralph Waldo Emerson

### चारोळी

रंगीबिरंगी कपडे एकत्र धुऊ नये
कपडे आपसात रंग बदलतात...
रंग बदललेले कपडे घालून ते,
फॅशन शोमध्ये रंग उधळतात...

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# 'आयसीओ' व 'आयएमओ' स्पर्धा परिक्षेत एलएमबी पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



ब्रम्हपुरी/का.प्र.

दरवर्षी एल. एम. बी. पब्लिक स्कुलमध्ये SOF मार्फत ऑलम्पियाड परिक्षा घेण्यात येतात. यावर्षी सुद्धा SOF, International Computer Science Olympiad Exam मध्ये ६ विद्यार्थी तर International Maths Olympiad मध्ये ५० विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केलेले आहे.

SOF अंतर्गत घेण्यात येणाऱ्या इंग्रजी, विज्ञान, गणित, संगणक ज्ञान या विषयात २०२४-२०२५ च्या परिक्षेत उतुंग यश प्राप्त केले. या स्पर्धेत एल. एम. बी. स्कुलमधील वर्ग १ ते १० वी च्या विद्यार्थ्यांना सर्व विषयाच्या सखोल ज्ञान व्हावे, जेणेकरून पदवी नंतरच्या स्पर्धा परिक्षांची तयारी करण्यास सोपे जावे. हा या परिक्षेमागील खरा उद्देश आहे. अलीकडच्या काळात स्पर्धेत टिकून राहायचे असेल तर आयटी आणि संगणकाचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक आहे. या हेतूला साध्य करण्यासाठी एल. एम. बी. पब्लिक स्कुलमधील शिक्षक वर्ग विद्यार्थ्यांकरिता सदैव प्रयत्नरत असतात. त्याचेच फलित म्हणून २०२४-२५ च्या ऑलिम्पिआड स्पर्धेत स्कुलच्या अनेक विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक व प्रमाणपत्र प्राप्त केले.

पदक प्राप्त विद्यार्थ्यांना शाळेच्या संचालिका अशिता भैया मॅडम, मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर यांच्या हस्ते मेडल, प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. अशाप्रकारे विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीला, विचारांना व सृजनशिलतेला वाव मिळत आहे.

# ब्रम्हपुरी तालुक्यातील ७५ ग्रामपंचायतींचे आरक्षण निश्चित

ब्रम्हपुरी/महेश पिलारे

गाववाड्यातील मिनी मंत्रालय समजल्या जाणाऱ्या ग्रामपंचायतींचे सरपंचपदासाठी आरक्षणाची सोडती बुधवारला तहसिल कार्यालय, ब्रम्हपुरी येथे काढण्यात आल्या. यातून 'कहीं खुशी, कहीं गम' असे संमिश्र चित्र पाहायला मिळाले. ब्रम्हपुरी तालुक्यातील ७५ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण सोडतीद्वारे निश्चित करण्यात आले. ब्रम्हपुरीचे तहसीलदार सतिश मासाळ यांच्या उपस्थितीत पुढील २०२५ ते २०३० या पाच वर्षांसाठी ग्रामपंचायत सरपंच आरक्षण ठरले. आरक्षण सोडत काढताना गावागावांतील अनेक राजकीय पुढारी, इच्छुक मंडळी उपस्थित होती. यात आरक्षणाचा फटका बसल्यामुळे काही जणांच्या पदरी निराशा आली, तर पूरक आरक्षणामुळे सरपंचपदाची संधी मिळण्याच्या आशेमुळे बरेच इच्छुक कामाला लागले. विशेषतः राजकीयदृष्ट्या संवेदनशील असलेल्या आणि ब्रम्हपुरी तालुक्यातील बड्या राजकीय नेत्यांशी संबंधित असलेल्या गावांच्या ग्रामपंचायतींमध्ये सरपंच पदाच्या आरक्षणाकडे सर्वांचे लक्ष वेधले होते. यात काहीजणांनी समाधानाचा सुस्कारा सोडला. तर काहीजणांच्या आशेवर पाणी फेरले गेल्याचे दिसून आले.

ब्रम्हपुरी तालुक्यातील ७५ ग्रामपंचायतच्या सरपंचपदाचे आरक्षण सोडतीतून ठरले. चौगान, गांगलवाडी, पिंपळगांव, खरकाडा, तोरगांव बूज, पारडगांव, आदी नेहमीच राजकीयदृष्ट्या चर्चेत राहणाऱ्या गावांमध्ये सरपंचपदाचे आरक्षण खुल्या गटाला लाभले. यातील काही ठिकाणी महिलांना संधी मिळणार आहे. सरपंचाचा पदासाठी अनुसूचित जातीसाठी राखीव आरक्षणात चिंचोली बुज (महिला), हळदा (महिला), सावलगाव (महिला), तुलानमेंढा, चिचगाव, चिखलगाव (महिला), पांचगाव (महिला), कोसंबी खडसमारा, कहाली, कालेता (महिला) व माहेर ग्रामपंचायती समावेश आहे. अनुसूचित जमातीसाठी सरपंच पदाच्या राखीव आरक्षणात बोरगाव (महिला), अर्हेर नवरगाव, मालडोंगरी, तळोदी खुर्द (महिला), बेलगाव (महिला), व मांगली या ग्रामपंचायती समाविष्ट आहेत. तसेच नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी राखीव आरक्षणात रानबोथली, जुगनाळा, चांदली (महिला), लाडज (महिला), गोगाव, बरडकिन्ही (महिला), आक्सापूर (महिला), जवराबोडी, मूई (महिला), मेंडकी, रामपुरी, आवळगाव (महिला), वांद्रा (महिला), बोडदा, मूडझा (महिला), कुडेसावली (महिला), कळमगाव, सायगाव, एकारा (महिला), भूज, व तुकुम या तर सर्वसाधारण गटात झिलबोडी, अड्याळ जाणी, चौगान (महिला), बेटाळा, खेडमक्ता, तोरगाव खुर्द (महिला), नान्होरी, दिघोरी, नांदगाव जाणी (महिला), पिंपळगाव भो. (महिला), सोंदरी (महिला), सोनेगाव (महिला), गांगलवाडी, कन्हाळगाव (महिला), बोढेगाव (महिला), भालेश्वर (महिला), निलज, रुई, हरदोली (महिला), सुरबोडी, रणमोचन, खराकाडा (महिला), खंडाळा, उदापूर (महिला), चांदगाव, वायगाव (महिला), बल्लारपूर माल (महिला), चोरटी (महिला), कोथुळना (महिला), चकबोथली, पारडगांव, किन्ही (महिला), लाखापूर, तोरगांव बूज (महिला), कोलारी, किटाळी (महिला), चिचखेडा व मरारमेंढा या ग्रामपंचायती आहेत.



Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
◆ सिंदेवाही
◆ नवरगांव
◆ तळोधी
◆ चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

सोरते
प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
स्टेनलेस स्टील वर्क्स
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी

रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.



# वंजारी हॉस्पिटलमधील कॅथलॅब...

(पान क्र. १ वरून)

केअर ब्रह्मपुरी या रुग्णालयातील कॅथलॅब व अतिदक्षता विभाग पुढील आदेशपर्यंत बंद ठेवण्याचा आदेश डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा रुग्णालय चंद्रपूर यांनी रुग्णालयाला दिला आहे. तसेच बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४९ अंतर्गत व महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी नियम सुधारित २०२१ अंतर्गत कायद्याचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेण्याचे सुद्धा जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा रुग्णालय चंद्रपूर यांनी सदर रुग्णालयाला आदेशाद्वारे कळविले आहे.

# हजारोंच्या संख्येत गुरुदेव भक्तांचा...

(पान क्र. १ वरून)

भारतीय संस्थेने कमलापूरची आश्रमशाळा विकली, आदर्श आमगावचे ७/१२ बदलविले, २ वर्षाआधी अध्यात्म गुरुकुल मोझरीचे सुद्धा ७/१२ बदलविले होते, पंढरपूरच्या आश्रमावर सुद्धा यांनी दावे केले आहे, असे हे अखिल भारतीय संस्था गुरुकुंज मोझरीचे पदाधिकारी म्हणजे प्रत्यक्ष राक्षस असून गुरुदेव सेवामंडळाच्या कार्यावर एक अलंक अभिशाप आहे. आपण सर्वांनी आपले गुरुदेव सेवामंडळ यांच्यापासून रक्षण करून यांच्या अन्यायाविरूद्ध एकजुटीने लढलो पाहिजे, यासाठीच हा शांती मोर्चा आहे.

त्यानंतर उपविभागीय अधिकारी, ब्रह्मपुरी यांना निवेदन देण्यात आले. त्यानंतर अड्याळ टेकडी येथे पालकमंत्री अशोक उईके यांच्या गाडीला घेराव करून त्यांना निवेदन सादर करण्यात आले. या प्रकरणाचा अभ्यास करून कायदेशीर जे आवश्यक आहे ती कार्यवाही अवश्य करू, असे आश्वासन त्यांनी दिले. ब्रह्मपुरी तालुक्याची, चंद्रपूर जिल्ह्याची अस्मिता असलेल्या अड्याळ टेकडीला अखिल भारतीय संस्थेच्या पदाधिकारी राक्षसांच्या घशात जाण्यापासून वाचविण्यासाठी अन्यायाच्या प्रतिकारार्थ गुरुदेव भक्तांमध्ये प्रचंड संताप असून त्याच्या उत्तरार्थात या भव्य शांती मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.


Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404